Impact Factor : 1.9152 (UIF)
Volume - 3 | Issue - 11 | July – 2017

देशीयता : संकल्पना आणि स्वरूप

प्रा.अनिलकुमार दडमल
मराठी विभाग प्रमुख, गुलाम नबी आझाद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
बार्शीटाकळी, जि.अकोला.

प्रास्ताविक :

'देशी' ही संकल्पना सर्वव्यापी अशा अर्थाने साहित्याच्या प्रांतात रूढ झालेली आहे. देशीयता या संज्ञेला एक प्राचीन परंपरा आहे. संत ज्ञानेश्वरांनी 'देशियेचेने नागरपणे। शांतु शृंगारात जिणे। तरि ओविया होती लेणे साहित्यासी। असे म्हटले आहे. मराठी साहित्याने पाश्चिमात्य साहित्याच्या पायावर आपली इमारत उभी केलेली आहे. मराठी साहित्याच्या भोवताली निर्माण झालेली पाश्चिमात्य साहित्याची कोंडी फोडण्यासाठी मराठीत देशीवादाने मोठी भूमिका निभावलेली आहे. वर्तमान साहित्याच्या क्षेत्रात देशीयतेचा अंगीकार केलेल्या कथा, कादंबरी, कवितांचे लेखन मोठ्या प्रमाणात होताना दिसते. मराठी बरोबर इतरही भारतीय भाषांतून (कानडी, गुजराती, तेलगू) देशीवादाला केंद्रस्थानी ठेवून साहित्याची निर्मिती झालेली आहे.

मराठी साहित्यात विशेषत: मराठी कादंबरीतून देशीयतेचा विचार मोठ्या प्रमाणात केंद्रस्थानी ठेवला गेला आहे. साठोत्तरी काळात मराठी साहित्याच्या क्षेत्रात झालेला आमुलाग्र बदल देशीयतेला साकारणारा आणि स्वीकारणारा असा ठरला आहे. सर्वसामान्य स्तरातून आलेला मराठी लेखक, आपला समाज, आपली परंपरा, आपली संस्कृती साहित्याच्या माध्यमातून प्रामुख्याने रेखाटू लागला. या साहित्याकडे, ''देशीवादाच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास मराठी साहित्य हे मराठी भाषिक समाजाने निर्माण केलेल्या कृतींचे असून त्यात मराठी भाषा, संस्कृती मध्यवर्ती असावी हे भान आवश्यक बनते. लेखक व ज्या समाजासाठी तो लिहितो त्यांचा एक नैतिक बांधिलकीचा संबंध असणे देशीवादाला जरुरी वाटते.''[१] डॉ.गणेश देवी यांनी अलीकडच्या काळात निर्माण होणारे मराठी साहित्य आणि देशीवाद यांचा नातेसंबंध स्पष्ट केला आहे. मराठी साहित्याने देशीवाद कशा पद्धतीने अंगीकारला होता हेही वरील विधानावरून प्रत्ययास येते.

१९६० नंतरच्या मराठी कादंबरीत देशियता मोठ्या प्रमाणात साकार होताना दिसते. मराठी कादंबरीत देशीवादाचा पुढाकार घेणारे प्रधान कादंबरीकार म्हणून भालचंद्र नेमाडे यांचा नामोल्लेख केला जातो. नेमाडे यांनी देशीवादाचे स्वरूप आणि देशीवादाची संकल्पनाही नेमक्या पद्धतीने स्पष्ट केलेली आहे. कादंबरी हा विस्तीर्ण जीवनपट व्यापणारा साहित्यप्रकार असल्याने देशीयतेची विविध अंगे तिच्यात सामावलेली पहावयास मिळतात. देशीयता ही संकल्पना प्रामुख्याने समाज, संस्कृती आणि माणूस यांच्या विस्तारित विश्वाला आवाक्यात घेणारी संकल्पना आहे.

Nativism या इंग्रजी शब्दाचा पर्याय समानार्थी शब्द म्हणून मराठीत देशीयता किंवा देशीवाद असे संबोधले गेले. भालचंद्र नेमाडे यांनी देशीवादाचे मूळ इतिहासात शोधले आहे. गौतम बुद्धाच्या विचारसरणीतून या संकल्पनेचे मूळ असल्याचे सांगितले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्म सोडून बौद्ध धर्म स्वीकारण्यात दाखविलेली निवड देशीवादाच्या दृष्टीने कशी महत्त्वाची आहे, ते नेमाडे यांनी पटवून दिले आहे. नेमाड्यांनी मराठी साहित्याला देशीयतेच्या या संकल्पनेत होण्यापूर्वीची पार्श्वभूमी लक्षात घेतली म्हणजे त्यांची ही भूमिका मराठी साहित्याच्या दृष्टीने कशी महत्त्वाची होती ते लक्षात येते. या संदर्भात अशोक बाबर यांनी नोंदविलेले मत विचारात घेणे महत्त्वाचे वाटते. ते लिहितात,''ज्या काळात नेमाडे यांची साहित्य सांस्कृतिक जडणघडण होत होती, त्या काळात तर देशी सौंदर्यशीलता अस्तित्वातच नव्हती किंवा तिची गरजच नाही. म्हणून कलावाद, सौंदर्यवाद, रुपवाद यासारख्या लेबलांचे स्तोम माजले

होते. याचा संताप नेमाडेंच्या संवेदनशीलतेमध्ये ठासून भरला गेला असल्याने त्यांनी प्रस्थापितांना जोरदार विरोध करण्यास सुरुवात केली आणि त्यांच्यातील खऱ्या जाणिवा विद्याशास्त्रीय परिभाषेत ते मांडू लागले. त्या परिस्थितीतच त्यांना देशीवाद मांडण्याची आवश्यकता वाटली.''[२] अशोक बाबर यांनी विशद केलेली ही पार्श्वभूमी विचारात घेता देशीयतेची निर्मिती आणि भालचंद्र नेमाडे यांनी तिचा केलेला पुरस्कार लक्षात येतो.

देशीयता ही सांस्कृतिक जीवन संदर्भांना अधोरेखित करणारी महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. संस्कृतीत जीवनातूनच साहित्याच्या अभिव्यक्तीला वाव मिळतो. कोणत्याही मानवी समाजात रूढी—परंपरा आणि संस्कृती यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. सांस्कृतिक वेगळेपणातूनच सामाजिक रचनेचे स्तर भेद निर्माण झालेले दिसतात. या सामाजिक स्तरात विविध मानव समूह एका विशिष्ट भौगोलिक आणि जैविक पर्यावरणात स्थिरावलेला पाहावयास मिळतो. या सांस्कृतिक विभिन्नतेचे बहुआयाम देशीवादाच्या रुपाने सामोरे आले आहेत. देशीयता हा सिद्धांत संस्कृतीच्या संदर्भातच कसा रास्त ठरतो. या अनुषंगाने भाष्य करताना डॉ.वासुदेव सावंत लिहितात,''एक साहित्य सिद्धांत म्हणून पाहिले तर देशीवाद हा साहित्याचा विचार संस्कृतीच्या संदर्भातच झाला पाहिजे असे मानणारा सिद्धांत आहे. म्हणून संस्कृती ही संकल्पना देशी वादात महत्त्वाची ठरते. संस्कृतीच्या रूपाविषयी जे प्रश्न उपस्थित होतात, त्या प्रश्नाविषयी देशीवादात एक निश्चित भूमिका घेतली जाते.''[३] डॉ.सावंत यांनी देशीवाद आणि संस्कृती यांचा अंतर संबंध स्पष्ट केला आहे. यावरून देशीवाद ही एक सांस्कृतिक साहित्य विचार संकल्पना असल्याचे स्पष्ट होते.

साठोत्तरी काळात लिहिणारे साहित्यिक हे प्रामुख्याने मध्यमवर्गीय ग्रामीण वातावरणातून आलेले आहेत. आधुनिकीकरणाच्या प्रचंड रेट्याखाली दबल्या गेलेल्या समाजातील आचार—विचार भावभावनांची अभिव्यक्ति साहित्याद्वारे होताना दिसते. आधुनिकीकरणाने प्रति संस्कृतीची एक मोठी लाट निर्माण केली. या प्रति संस्कृतीच्या आहारी न जाता स्वतंत्र संस्कृतीची प्रदीर्घ परंपरा आणि स्वत:ची मूल्यव्यवस्था असणाऱ्या देशाने देशीयतेच्या मार्गाने आपला वेगळा ठसा उमटल्याचे दिसून येते. देशियतेने वर्तमान समाजातील जीवनाचे विविधांगी आणि वास्तव चित्र उभे केले आहे. या प्रचंड गतिमान झालेल्या युगाला स्वत:ची ओळख निर्माण करून देण्यासाठी देशीवाद महत्त्वाचा ठरतो. देशीयतेने साहित्याच्या पारंपरिकतेचे मूल्यविवेकाचे स्वरूप दर्शविले आहे. देशीयतेच्या भूमिके संदर्भात भालचंद्र नेमाडे यांनी केलेले सूतोवाच महत्त्वपूर्ण ठरते ते म्हणतात,''देशीपणा हा आशा, भावना, जाणिवा, विचार, प्रबोधन आणि स्मृती यांच्या पूजाला आव्हान करतो. जो विशिष्ट भूप्रदेशाच्या सहकार्याने वाढत आलेला असतो. त्यामुळे देशीपणाच्या जाणिवेत भावनाप्रधान काव्यात्मता अधिक असते, तर विवेकशीलता त्यामानाने कमी असते. परंपराभिमुखता जास्त आणि आधुनिकता कमी असते. तसेच तिचे तोंड भविष्यकाळापेक्षाही भूतकाळाकडे जास्त वळलेले असते. देशीपणा हा मागच्या व पुढच्या समूहगणाचा प्रतिसाद असतो. सबंध समूहाच्या वंशाची ती जीवनशैली असते. समाजाची सामूहिक चिंतनशक्ती आणि भावशक्ती देशीपणात प्रकट होते.''[४] देशीयतेच्या बहुआयामीत्वाला आणि त्याच्यातील देशीपणाला अत्यंत पारदर्शकतेने नेमाडे यांनी रेखाटले आहे. देशीपणाचे महत्त्व अधोरेखित करताना नेमाडे यांनी देशीपणाचा अंतर्भाव या विश्वाचे स्वरूप नेमकेपणाने स्पष्ट केले आहे. म्हणूनच मराठी साहित्यात देशीवाद ही संकल्पना महत्त्वाची ठरते.

समारोप :

सारांश रूपाने असे सांगता येते की, मराठी साहित्यात देशीयतेची संकल्पना ही परंपरा आणि आधुनिकता यांच्या अनुषंगाने महत्त्वाची ठरलेली आहे. मराठी संस्कृती आणि लेखन परंपरा यांच्यातील परस्परभिन्नत्व खऱ्या अर्थाने देशीयतेच्या संकल्पनेमुळे ठळक झालेली आहे, असे स्पष्टपणे नमूद करता येते. देशीयतीची संकल्पना ही स्वतंत्र मराठी साहित्य निर्मितीच्या वृद्धिस अत्यंत कारक ठरलेली आहे हे दिसून येते. म्हणूनच साठोत्तरी कालखंडात निर्माण झालेल्या मराठी साहित्यातून देशीयतेची नेमकी जाणीव अधिकाधिक वाढीस लागलेली आहे.

संदर्भ :

१) डॉ.गणेश देवी, समीक्षेतील संकल्पना, संपा. डॉ.मनोहर जाधव, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पृ.१८७
२) अशोक बाबर, ललित, भालचंद्र नेमाडे विषेशांक, संपा.अशोक कोठावळे, जून २०१५, पृ.१८२

३) डॉ.वासुदेव सावंत, समीक्षेतील नव्या संकल्पना, उ.नि.पृ.१९१
४) भालचंद्र नेमाडे, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पृ.९०